महा मेट्रो

PUNE METRO

**महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड**

**(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)**

**महा मेट्रो तर्फे सेफ्टी मॉक ड्रिलचे आयोजन**

**आतापर्यंत ३ मॉक ड्रिलच्या माध्यमातून १५० कर्मचाऱ्यांना दिले प्रशिक्षण**

पुणे २७: महा मेट्रो पुणे प्रकल्पात कार्य करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी महा मेट्रोतर्फे मेट्रो कार्यस्थळी सेफ्टी मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले. आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेसाठी कोणत्या उपाय योजना करायला हवे याचे प्रशिक्षण मॉक ड्रिलच्या माध्यमातून देण्यात आले. आणीबाणीची परिस्थिती उद्भवली तर त्यात अडकलेल्या व्यक्तींच्या बचावाकरता केल्या जाणाऱ्या उपाय योजनांची माहिती देण्यात आली. बचाव प्रक्रियेमध्ये बचाव यंत्राचा व यंत्रणांचा कसा वापर करावा ? अचानक घडलेल्या घटनेला कारणीभूत बाबींचे निरीक्षण करून आवश्यक नोंदी करणे का आवश्यक आहे ? याचे महत्व पटवून देत कार्यस्थळी उद्भवणाऱ्या धोक्यासंबंधी सविस्तर माहिती अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आली.

या मॉक ड्रिल अंतर्गत एक कर्मचारी तब्बल ३० फूट पेक्षा ज्यास्त उंचीवर अडकला होता. त्याच्या बचावासाठी नाट्यमय पद्धतीने इतर कर्मचारी धावपळ करत आवश्यक उपकरण गोळा करीत होते. त्यांनतर नियोजित पद्धतीने उंचावर अडकलेल्या कर्मचाऱ्याला वाचविण्यात आले. यानंतर लगेच त्याला आवश्यक त्या

सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. कर्मचाऱ्याला सुरक्षितपणे वाचवल्यानंतरच आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणी करून घटनेतील परिस्थितीवर नियंत्रण आणण्यात आले.

महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे प्रकल्पांच्या विविध कार्यस्थळांवर मॉक ड्रिलचे आयोजन केले जाते. एका मॉक ड्रिलमध्ये किमान ५० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. आतापर्यंत ३ मॉक ड्रिलचे आयोजन महा मेट्रोतर्फे करण्यात आले असून सुमारे १५० कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला आहे. महा मेट्रोतर्फे वेळोवेळी अश्या प्रकारे मॉकड्रिलचे आयोजन करण्यात येते. जमिनीच्या एका विशिष्ट उंचीवर रस्सीला धरून काम करणाऱ्या कामगारांपासून मॉक ड्रिलची सुरवात होते.

आंतरराष्ट्रीय मानकानुसार उंचावर काम करतांना जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी साधारणतः ३० मिनिटाचा कालावधी लागतो. मात्र, महा मेट्रोने मॉक ड्रिलच्या माध्यमाने केवळ ९ मिनिटात कश्याप्रकारे या कर्मचाऱ्यांना वाचवता येऊ शकते हे सिद्ध करून दाखवले. मॉक ड्रिल होत असतांना पुणे वाहतूक पोलीस विभागांचे अधिकारी उपस्थित होते. वाहतूक अधिकाऱ्यांनी देखील यावेळी काही आवश्यक व महत्वाच्या घटकांची जाणीव उपस्थितांना करून दिली. महा मेट्रोचा सुरक्षा विभाग मेट्रो कामांच्या स्थळावर निरंतर लक्ष ठेऊन असतो. मेट्रो कर्मचाऱ्यांना व्यक्तिगत सुरक्षा उपकरण जसे की;बूट,जैकेट, इत्यादी वैयक्तिक (PPE – Personal Protective Equipment) सुरक्षा उपकरण मेट्रो कर्मचाऱ्यांना पुरविल्या जाते व कार्यस्थळी त्यांन ते घालण्यास अनिवार्य केले जाते. मेट्रो सुरक्षा विभाग कार्यस्थळी उपस्थित मेट्रो कर्मचाऱ्यांना कडे लक्ष पूर्वक नियंत्रण ठेवत असते व कुठल्याही ठिकाणी त्रुटी आढळल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाते. मेट्रो कार्यस्थळांचे विभाजन करण्यात आले असून PPE व  Non PPE असे सुनिश्चित विभाग करण्यात आले आहेत.या व्यतिरिक्त मेट्रो निर्माणाधीन मार्गावर योग्य असे बैरिकेड,रेड लाईट (चालू बंद होणारे) वाहतूक नियमांचे चिन्ह लावल्या जाते जेणेकरून कोणतीही इजा प्रवासी वाहनांना व मेट्रो कर्मचाऱ्यांना होऊ नये.